**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे**
**कार्यालय. नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१**

**दुरध्वनी क्र. ०२०-२६१२ ७२१७, २६१२ २८४६/४७** **फॅक्स क्र. ०२०-२६१३ ३०८२, २६१२ ७००४**
**Email :- comm_audit@rediffimail.com**

---

जाक्र/सआ/अनिलेप/नागरी बँक पॅनेल/ 9993 /११
दिनांक : २२ डिसेंबर, २०११

प्रति,
चेअरमन,
वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल ऑफ इंडिया,
२७, अन्वेषक, आय. सी. ए. आय भवन,
कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४००००५

**विषय :- नागरी सहकारी बँकेच्या पॅनलमधुन सनदी लेखापालांचे नाव वगळणेबाबत.**

उपरोक्त विषयाचे कृपया अवलोकन व्हावे.

वरील विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येऊन कळविण्यात येते की, काही नागरी सहकारी बँकांना लेखापरीक्षण कालवधीकरीता प्रदान करण्यात लेखापरीक्षण वर्गवारीबाबत या कार्यालयात अपील दाखल करण्यात आलेली आहेत. बँकेच्या सदर लेखापरीक्षण वर्गवारीबाबतच्या अपिलाच्या सुनावणीकरीता संबंधीत सनदी लेखापाल यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. तथापि सदर सुनावणीकरीता संबंधीत सनदी लेखापाल उपस्थित नसल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आलेले आहे.

तरी जे सनदी लेखापाल बँकेच्या लेखापरीक्षण वर्गवारीबाबतच्या अपिलाच्या सुनावणीकरीता उपस्थित राहणार नाहीत, अशा सनदी लेखापालाचे नाव पॅनेलवरुन कमी करण्यात येईल अशी स्पष्ट सुचना वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल ऑफ इंडियाच्या वेब साईटद्वारे सर्व सनदी लेखापाल यांना निर्गमीत करावी व तसे केल्याचा तपशील या कार्यालयास अवगत करणेत यावा.

सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

W. I. R. C.
Inward Register Sr. No. 28212
Date 02/01/12

To Dinesh
Subhash

D:\vy3\VMS -vy3\Letters.doc

www.taxguru.in